**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी**, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.
Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्र ३६६** **दिनांक: ३०.१२.२०२१**

## ०२ गावठी कट्टे ०९ जिवंत काडतुसे, ०१ चॉपर व नकली नोटांसह ०४ आरोपीतांना अटक- पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २९/१२/२०२१ रोजी तुंगारफाटा वसई (पु.) ता. वसई, जि. पालघर येथे संशईत इसम बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र घेवुन येणार असल्याची खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाल्याने, सदर बातमीचे आधारे त्यांनी लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन शिताफिने ४ संशईतांना पकडून ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी १) डेव्हीड ऊर्फ तारकेश्वर सुर्यबली यादव, २) राहुल कृष्णमुरारी चौहाण, ३) रामसेवक प्रभुनाथ चौहाण व ४) शिवान रामसुरत यादव सर्व रा. तुंगारफाटा, वसई(पु.), मुळ रा. राज्य-उत्तरप्रदेश अशी सांगितली. नमुद संशईतांची बातमीची अनुषांगाने विचारपूस करुन अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात ०२ गावठी कट्टे, ०९ जिवंत काडतुस, ०१ चॉपर, १००/- रुपये दराच्या ३६१ व ५०/- रुपये दराच्या १५६ अशा एकुण-४३,९००/- रुपयांच्या नकली भारतीय चलनी नोटा असा एकुण-८७,९००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I १८७/२०२१ भा.दं.वि.सं. कलम- ४८९ (क), सह भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम-३/२५ प्रमाणे दिनांक २९/१२/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), महिला सपोनि/मनिषा पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---